


दैनिक
अचूक वेध,अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : २५०, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.२२ एप्रिल २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## बच्चू कडूंना शिवसेनेची 'ऑफर'?

## एकनाथ शिंदे यांच्याशी विधान परिषदेच्या उमेदवारीवर चर्चा



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, अमरावती :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून विधान परिषदेसाठी माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांना 'ऑफर' देण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या राजकीय हालचालींमुळे मुंबईसह थेट अमरावतीच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. येत्या १२ मे रोजी ही विधान परिषदेची निवडणूक होत आहे.

अचलपूर मतदारसंघातून चार वेळा कडू हे आमदार म्हणून निवडून आले. शेतकरी, दिव्यांगांच्या प्रश्नांवरून त्यांची आंदोलने राज्यभरात गाजली. नागपुरातील शेतकरी आंदोलनाचा परिणाम म्हणून सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफी जाहीर केली. ही कर्जमाफी व्हावी म्हणून अलीकडेच त्यांनी मेळघाटात ११ दिवस शेतकरी संघर्ष यात्रा काढली होती. या प्रत्येक वेळी एकनाथ शिंदे यांनी कडू यांच्याशी संवाद साधला.

कर्जमाफीचे संपूर्ण श्रेयही त्यांनी जाहीररित्या कडू यांना दिले होते. आता थेट पक्षाकडून विधान परिषदेची ऑफर देण्यात आली आहे. विधान परिषदेच्या माध्यमातून 'प्रहार'चा आवाज थेट मुंबईच्या पटलावर पोहोचणार की कडू पुन्हा एकदा प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात आपला स्वतंत्र बाणा दाखवणार, याकडे अमरावती जिल्ह्यासह राज्याचे लक्ष लागले आहे.

**प्रहार'ची भूमिका ठरणार निर्णायक**

मुंबईत झालेल्या सुमारे अर्धा तासाच्या बैठकीत कडू आणि शिंदे यांच्यात नेमकी काय चर्चा झाली, हे अद्याप गुलदस्त्यात आहे. मात्र, बच्चू कडू यांनी अतिशय सावध पवित्रा घेत, आपल्या कार्यकर्त्यांशी चर्चा करूनच अंतिम निर्णय घेणार, अशी प्रतिक्रिया दिली असल्याचे समजते. यासंदर्भात बच्चू कडू यांची प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी प्रत्यक्ष संपर्क साधला असता, ते उपलब्ध होऊ शकले नाहीत.

**आडवे आले, तर सोडणार नाही : शिंदे**

'सातारा जिल्हा परिषद निवडणुकीत घडलेले राजकारण हीन पातळीचे असून, या यशवंत भूमीला ते कधीही मान्य होणार नाही,' असा घणाघाती इशारा शिवसेनेचे प्रमुख , उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांना दिला. 'मी स्वभावाने रोखठोक आहे, हिशेब चोख ठेवतो. आडवे आले तर सोडत नाही,' असा थेट इशारा त्यांनी दिला . गांधी मैदानावर आयोजित शिवसेनेच्या कार्यकर्ता मेळाव्यात शिंदे बोलत होते. या वेळी पर्यटनमंत्री शंभुराज देसाई, उद्योगमंत्री उदय सामंत, संपर्कप्रमुख शरद कणसे, हरिभाऊ जगदाळे, जिल्हाध्यक्ष रणजीतसिंह भोसले आदी उपस्थित होते. या वेळी भाजपमधील उदयनराजे गटाच्या काही कार्यकर्त्यांनी शिवसेना पक्षात प्रवेश केला. नवनिर्वाचित जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगरपालिका सदस्यांचा सत्कारही करण्यात आला.

## डेअरी आणि चीज ॲनालॉगच्या वापराबाबत अन्न व औषध प्रशासनाचे आवाहन

**दि.२१, ठाणे :** अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ च्या ध्येयधोरणानुसार सर्वसामान्य जनतेला सकस आणि सुरक्षित अन्नपदार्थ उपलब्ध करून देणे, हे प्रशासनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. भारत हा दुग्ध उत्पादनात जगात अग्रेसर असून भारतीय आहारामध्ये पनीरला विशेष महत्त्व आहे. चविष्ट असण्यासोबतच पनीर हे प्रथिने, कॅल्शियम आणि आवश्यक खनिजांनी समृद्ध असल्याने शाकाहारी लोकांसाठी ते पोषणाचा एक उत्तम स्रोत मानले जाते. मात्र, अलीकडे बाजारपेठेत 'पनीर' आणि 'चीज' यांच्या नावाखाली ' ॲनालॉग' पदार्थांचा वापर वाढत असल्याचे समोर आले आहे. मुळात पनीर हा केवळ दुधापासून बनवलेला पदार्थ असतो, तर दुसरीकडे 'डेअरी ॲनालॉग' हे दूध सोडून इतर खाद्यतेल, स्टार्च आणि इमल्सिफायर वापरून बनवले जाते, जे केवळ पनीरसारखे दिसते पण प्रत्यक्षात पनीर नसते. अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे की, अनेक रेस्टॉरंट्स, हॉटेल्स आणि फास्ट फूड विक्रेते अन्न तयार करताना मोठ्या प्रमाणात चीज ॲनालॉगचा वापर करतात, परंतु ग्राहकांना त्याबाबत कोणतीही स्पष्ट माहिती दिली जात नाही. यामुळे ग्राहकांची फसवणूक आणि दिशाभूल होत असून अशा तक्रारी प्राप्त होत आहेत. कायद्यानुसार ग्राहकांना ते काय खातात हे जाणून घेण्याचा पूर्ण अधिकार आहे. अन्न सुरक्षा मानके (लेबनलिंग आणि डिस्प्ले) विनियम २०२० नुसार, सर्व अन्न व्यवसायिकांनी विक्रीच्या ठिकाणी पदार्थांमधील घटक आणि पोषणमूल्यांची माहिती प्रदर्शित करणे बंधनकारक आहे. तसेच उत्पादक आणि पुरवठादारांनी त्यांच्या विक्री बिलावर तो पदार्थ 'डेअरी ॲनालॉग' किंवा 'चीज ॲनालॉग' असल्याचे स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे.

हॉटेल आणि रेस्टॉरंट चालकांसाठी आता हे अनिवार्य करण्यात आले आहे की, जर त्यांनी ॲनालॉग पदार्थांचा वापर केला असेल, तर त्याचा स्पष्ट उल्लेख त्यांच्या मेनूकार्डवर किंवा इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले बोर्डवर असणे आवश्यक आहे. ग्राहकांनी देखील जागरूक राहून पॅकबंद उत्पादने खरेदी करताना त्यावरील लेबल तपासावे आणि हॉटेलमध्ये ऑर्डर देताना पनीर व चीज ॲनालॉग स्वतंत्रपणे नमूद केले आहेत का, याची खात्री करावी. विशेष म्हणजे, ॲनालॉग पदार्थ आरोग्यास अपायकारक नसले तरी त्यांची पोषणमूल्ये पनीरपेक्षा पूर्णपणे वेगळी असतात, त्यामुळे ग्राहकांना योग्य माहिती असणे गरजेचे आहे.

अन्न सुरक्षा आयुक्त श्री.श्रीधर डुबे-पाटील यांनी असा इशारा दिला आहे की, कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही विक्रेत्यावर किंवा उत्पादकावर कठोर कारवाई केली जाईल. ज्या व्यावसायिकांनी परवाना घेताना स्वतःचा ईमेल किंवा मोबाईल क्रमांक दिलेला नाही, त्यांनी तो तातडीने अपडेट करावा. प्रशासनाकडून हॉटेल चालकांना यासंदर्भात आवश्यक सूचना त्यांच्या नोंदणीकृत क्रमांकावर पाठवण्यात आल्या आहेत. ग्राहकांनी अशा प्रकारची दिशाभूल झाल्यास किंवा फसवणूक होत असल्याचे आढळल्यास प्रशासनाच्या १८००-२२२-३६५ या टोल फ्री क्रमांकावर आपली तक्रार नोंदवावी, असे आवाहनही अन्न व औषध प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# दोन उड्डाणपुलांमुळे मुंबईतील वाहतूककोंडी सुटणार!

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, मुंबई :** मुंबई महापालिकेने शहरांत मोठ्या प्रमाणात गर्दी कमी करण्यासाठी उपाययोजना सुरू केल्या आहेत. त्याअंतर्गत भायखळा आणि माझगावला जोडणारे दोन नवीन पूल तयार करण्यात येणार आहेत. मुंबईतील अतिगर्दीचे ठिकाण असलेल्या या दोन भागांना जोडणाऱ्या या पुलांमुळे वाहतूककोंडीची समस्या मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.

**कसे असतील पूल?**

सायंकाळी गर्दी असताना भायखळा आणि माझगाव येथे प्रचंड वाहतूक कोंडी होती. ही वाहतूककोंडी फोडण्यासाठी भायखळा येथे ९१६ मीटर लांबीचा केबल स्टेड पूल बांधण्याची योजना आहे. याच पुलाला माझगावशी ८९२ मीटर लांबीच्या उड्डाणपुलाने जोडण्यात येणार आहे. या दोन पुलांमुळे दक्षिण मुंबईतील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. भायखळा येथे १०३ वर्ष जुन्या वाय पुलाच्या जागी बीएमसीने एका नव्या केबल-स्टेड पुलाचा प्रस्ताव मांडला आहे. भायखळा ते माझगाव दरम्यान एलिव्हेटेड कनेकटीव्हीटी नसल्यामुळे वाहनचालकांना रिचर्डसन आणि क्रुडाल जंक्शन आणि सब्बू सिद्दिकी जंक्शनमधून प्रवास करावा लागतो. त्यामुळे कोंडीची समस्या उद्भवते. या नव्या पुलांमुळे जेजे उड्डाणपुलापासून आणखी एक उड्डाणपूल तयार केला जाईल. हा पूल भायखळा येथील आगामी वाय उड्डाणपुलाला जोडेल. यामुळे दक्षिण मुंबईत एका नव्या हाय स्पीड कॉरिडोरची निर्मिती होईल.

**१० मिनिटांत प्रवास**

या केबल स्टेड पुलावर सहा पदरी वाहतूक सुरू असेल. हा पूल एकूण ९१६ मीटर लांब असेल. जुन्या पुलापेक्षा अधिक रुंद आणि भविष्यातील वाढती वाहन संख्या लक्षात घेता फायद्याचा ठरेल. या पुलावर प्रवाशांसाठी सेल्फी पॉईंट असेल आणि रोशनाई केली असेल. दरम्यान, दुसरा ८४८ मीटर उड्डाणपूल ४ पदरी असेल. हा संपूर्ण कॉरिडोर तयार होताच सीएसएमटी



(फोर्ट) ते भायखळा दरम्यान अंतर कमी होणार आहे. सध्या ३० ते ४५ मिनिटे लागणारा प्रवासाचा वेळ अवघ्या १० मिनिटांवर येणार आहे.

**कधी होणार काम पूर्ण?**

या नवीन केबल-स्टेड पूलाचं काम ७८ टक्के पूर्ण झालं असून तो नोव्हेंबर २०२६पर्यंत प्रवासासाठी खुला करण्यात येईल. दुसऱ्या उड्डाणपुलासाठी वर्क ऑर्डर जारी करण्यात आले आहेत आणि बांधकाम सध्या सुरू आहे. हा पूल तयार करण्यासाठी २०२८ची डेडलाइन देण्यात आली आहे. त्यामुळे काही वर्षांत दक्षिण मुंबईतील प्रवास सुखकर होणार आहे.

या प्रकल्पासाठी १,८४१ कोटींचा खर्च अपेक्षित आहे. भायखळा येथील केबल-स्टेड पुलासाठी २८० कोटींचा खर्च करण्यात आला आहे. तर दुसऱ्या उड्डाणपुलासाठी १,५६१ कोटींचा खर्च येणं अपेक्षित आहे. हा केबल स्टेड पूल रेल्वे रुळांवरून जाणार आहे. या भागाचं डिझाइन सध्या प्रलंबित असल्यामुळे खर्च कमी आहे.

## शिक्षकांवर अन्याय करणारे शासन निर्णय रद्द करा ! मार्च महिन्याचे वेतन तात्काळ करा

## आ.सुधाकर अडबाले यांच्या नेतृत्वाखाली धरणे/निदर्शने आंदोलन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२१, चंद्रपूर :** मार्च पेड इन एप्रिल चे वेतन तात्काळ अदा करण्यात यावे व शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे अन्यायकारक असे दि. १ एप्रिल २०२६, दि. २ एप्रिल २०२६ व, दि. २ एप्रिल २०२६ हे तीन शासन निर्णय रद्द करण्यात यावे, या प्रमुख दोन मागण्यांसाठी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने विमाशि संघाचे सरकार्यवाह तथा आमदार सुधाकर अडबाले यांच्या नेतृत्वाखाली एक दिवसीय धरणे / निदर्शने आंदोलन दि. २० एप्रिल २०२६ रोजी शिक्षण उपसंचालक नागपूर यांचे कार्यालयासमोर करण्यात आले.

राज्यातील शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मार्च पेड इन एप्रिल चे वेतन अजून झालेले नाही. वेतन अदा करण्याबाबत अनेक अडचणी येत असल्याने शिक्षकांचे पगार थांबले आहेत. त्यामुळे आर्थिक भुर्दंड सहन करावा लागतो आहे. तसेच शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र. माशाअ २०२५/प्र.क्र.५२/एसएम-४, दि. १ एप्रिल २०२६, माशाअ २०२४/प्र.क्र. ई-१३१२८८३/एसएम-४, दि. २ एप्रिल २०२६ व माशाअ २०२४/प्र.क्र. ई-




१३१२९६३/एसएम-४, दि. २ एप्रिल २०२६ नुसार कायम विना अनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या तथापि मुल्यांकनाच्या व अनुदानाच्या निकषांमध्ये काही पात्र व अपात्र झालेल्या खाजगी प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा / तुकड्या बंद करून स्वयंशासित करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. यामुळे गेल्या १५ ते २० वर्षांपासून बिनपगारी काम करणाऱ्या शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांवर मोठा अन्याय झालेला आहे. त्यामुळे सदर शासन निर्णय तात्काळ रद्द करण्यासाठी धरणे / निदर्शने आंदोलन करण्यात आले.

यावेळी आंदोलनातील प्रमुख मागण्यांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. सोबतच राज्यातील शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या ज्वलंत विषयांवर संबोधित केले. विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय नागपूर येथे विभागातील अनेक प्रकरणे दीर्घ काळापासून पेंडिग असल्याने याबाबत वरिष्ठांकडे तक्रार करण्यात आल्याचेही यावेळी आमदार सुधाकर अडबाले यांनी सांगितले. सोबतच आमदार ॲड. अभिजीत वंजारी यांनीही मार्गदर्शन केले. धरणे आंदोलनातील मागण्यांचे निवेदन विभागीय उपसंचालक नागपूर यांच्यामार्फत शासनास पाठविण्यात आले. या धरणे / निदर्शने आंदोलनाला विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे प्रांतीय उपाध्यक्ष रमेश काकडे, जयप्रकाश थोटे, विगागीय कार्यवाह चंद्रशेखर रहांगडाले, कोषाध्यक्ष भूषण तल्हार, महामंडळ उपाध्यक्ष जगदीश जुनघरी, नागपूर जिल्हाध्यक्ष अनिल गोतमारे, जिल्हा कार्यवाह संजय वारकर, महानगर कार्यवाह अविनाश बडे, भंडारा जिल्हाध्यक्ष सुधाकर देशमुख, जिल्हा कार्यवाह राजेश धुर्वे, वर्धा जिल्हा कार्यवाह महेंद्र सालंकार, चंद्रपूर जिल्हाध्यक्ष सुनील शेरकी, जिल्हा कार्यवाह दीपक धोपटे, महानगर अध्यक्ष मोहम्मद शकील, महानगर कार्यवाह सुरेंद्र अडबाले, गडचिरोली जिल्हाध्यक्ष रवींद्र नैताम, जिल्हा कार्यवाह अजय लोंढे व शिक्षक - कर्मचारी, पदाधिकारी, सदस्य यांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**दोन शालार्थ आयडी मंजूर**

बऱ्याच दिवसापासून प्रलंबित असलेले वर्धा जिल्ह्यातील दोन शालार्थ आयडी प्रकरणे आंदोलनादरम्यान निकाली काढण्यात आले. यात अनुकंपा प्रकरणातील प्रथमेश साटोटे (कनिष्ठ लिपीक, जगजीवनराम माध्यमिक विद्यालय, रामनगर, वर्धा) व कैलाश कोडापे (शिपाई सेवक, यशवंत हायस्कूल, अंदोरी, ता. देवळी, वर्धा) यांना शालार्थ आयडी पत्र आंदोलनानंतर देण्यात आले.

## मीनाक्षी शिंदेची नगरसेवकांना पेन्शनची मागणी; अजय जेया यांचा तीव्र विरोध

**अक्षराज : तानाजी ताकतोडे**

**दि.२१, ठाणे :** महानगरपालिकेतील नगरसेवक/नगरसेविकांना पेन्शन सुरू करण्याच्या मागणीबाबत माजी महापौर मीनाक्षी शिंदे यांनी महापौरांकडे पत्राद्वारे मागणी केल्याची माहिती समोर आली आहे. त्यांच्या पत्रात आमदार-खासदारांना पेन्शन मिळते, त्यामुळे नगरसेवकांनाही पेन्शन मिळावी व दोन वर्षे पूर्ण झाल्यावर पेन्शन लागू करावी अशी भूमिका मांडण्यात आली आहे.

या मागणीविरोधात ठाणे शहरातील जागरूक नागरिक अजय जेया यांनी आज ठाणे महानगरपालिकेच्या मा. महापौरांना निवेदन देऊन तीव्र विरोध नोंदविला. अजय जेया यांनी स्पष्ट केले की, नगरसेवकांना पेन्शन देण्याची मागणी ही अनावश्यक, अनुचित आणि करदात्यांच्या पैशावर अतिरिक्त आर्थिक भार टाकणारी आहे.



अजय जेया यांनी सांगितले की, महानगरपालिकेचा निधी हा जनतेच्या करातून जमा होतो आणि तो रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज, आरोग्य, स्वच्छता आणि विकासकामांसाठी वापरला गेला पाहिजे. अशा निधीतून लोकप्रतिनिधींना पेन्शन देणे म्हणजे जनहिताच्या निधीचा गैरवापर ठरेल.

त्यांनी पुढे नमूद केले की, आजच्या काळात बहुतांश नगरसेवक आर्थिकदृष्ट्या सक्षम असून अनेक नगरसेवक आधीच संपन्न आहेत. त्यामुळे पेन्शनची मागणी करणे म्हणजे विकासकामांवर परिणाम करणारी बाब ठरेल.

अजय जेया यांनी महापौरांकडे मागणी केली की, असा कोणताही प्रस्ताव पुढे नेण्याआधी प्रत्येक नगरसेवकाचे व त्यांच्या कुटुंबाचे संपूर्ण आर्थिक ऑडिट, मालमत्ता तपासणी व उत्पन्नाचे स्रोत सार्वजनिक करणे बंधनकारक करावे. तसेच जनतेची स्पष्ट परवानगी (मँडेट) घेऊनच अशी मागणी मान्य करावी.

शेवटी अजय जेया यांनी स्पष्ट इशारा दिला की, जर नगरसेवकांना पेन्शन देण्याचा निर्णय जबरदस्तीने लागू करण्याचा प्रयत्न झाला, तर ठाणेकर नागरिक लोकशाही मार्गाने आंदोलन करून तीव्र विरोध करतील.




## अनुदान बंद झाल्यानंतर...

सरकारने मध्यंतरी दोन आदेशांद्वारे माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागाच्या अनेक वर्षांपासून विनाअनुदान तत्त्वावर काम करणारे अनेक शिक्षक आणि संस्थांचे भवितव्य अंधकारमय दरीत लोटले आहे. या संस्था आणि संस्थांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांची अनुदानाची दारे आता कायमस्वरूपी बंद झाली आहेत. सन २०११च्या शासन निर्णयानुसार, तीन वर्षांत शाळा अनुदान निकष पूर्ण न केल्यास शाळा बंद करणार, असे जाहीर केले होते. ही कृती वेळीच झाली असती तर पुढील बारा वर्षांची फरफट तरी टळली असती.

'विनाअनुदान' या शब्दाचा शिक्षण क्षेत्रातील प्रवेश १९८३मध्ये झाला. वैद्यकीय आणि अभियांत्रिकी शिक्षण घेण्यास उत्सुक विद्यार्थी आपल्या राज्यात प्रवेशाच्या संधी कमी असल्याने अन्य राज्यांत शिक्षणासाठी जात होते, हे लक्षात घेऊन त्यासाठी विनाअनुदान तत्त्वाची कल्पना पुढे आली. ४२व्या घटना दुरुस्तीमुळे शिक्षणाचा समावेश समावर्ती यादीत झाला, तर ८६व्या घटना दुरुस्तीमुळे त्याला मूलभूत हक्काची मान्यता मिळाली. शासकीय अनुदानाआधारे चालणाऱ्या शिक्षण व्यवस्थेत १९८९पासून 'अनुदान टप्पा सूत्र' सुरू झाले.

शाळा सुरू झाल्यावर दहावीच्या निकालावर आधारित तेथून पुढे २५- ५० -७५ -१०० टक्के असा प्रवास करत साधारण सात ते आठ वर्षांत शाळा पूर्ण अनुदानावर येण्याचे धोरण निश्चित झाले. मात्र, सुरुवातीला काही 'भाग्यवंत शाळा' या धोरणानुसार अनुदानावर आल्या. अनुदान हा स्वेच्छा अधिकार असल्याने आणि विशेष आपत्तीचा निधी अन्य ठिकाणी वर्ग झाल्याने अनुदानापासून वंचित अनेक शाळा १९९५च्या सुमारास अनुदानावर आल्या. ११ ऑक्टोबर २००० रोजी या टप्पा प्रकारात बदल करून तो २०- ४०- ६०- ८०- १०० असा करण्यात आला. यावेळी आदिवासी शाळांना काही सवलती देण्यात आल्या. अनुदानावर येण्यासाठी १०० गुणांचे निकष जाहीर करण्यात आले. यामध्ये उपस्थिती-प्रति इयत्ता ३५चा पट धरून विद्यार्थी उपस्थिती (२० गुण), दहावी निकाल (३० गुण), नागरी क्षेत्र (१० गुण ), विद्यार्थी आर्थिक स्तर (१० गुण) आणि सर्व प्रकारच्या भौतिक सुविधा (३० गुण) या निकषांवर शाळेच्या अनुदानाचे भवितव्य ठरेल, असे जाहीर झाले. याबरोबरच शाळा जरी अनुदानास पात्र झाली तरी निधी उपलब्धतेनुसार अनुदान मिळेल व त्यात कोणतेही थकीत वेतन मिळणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले. याच प्रवासात २४ नोव्हेंबर २००१ मध्ये 'कायम विनाअनुदान तत्त्व' ही वेगळीच संकल्पना अस्तित्वात आली.

१७ फेब्रुवारी २००४च्या शासन निर्णयानुसार अनुदानास पात्र शाळांची यादी घोषित करण्यात आली. २० जुलै २००९च्या शासन निर्णयानुसार इंग्रजी माध्यमाच्या शाळा वगळता प्राथमिक, माध्यमिकमधील 'कायम' शब्द काढून टाकण्यात आला आणि अस्तित्वात असणाऱ्या शाळा २०१२- १३ पासून मूल्यांकनास पात्र होतील, असे जाहीर करण्यात आले. १५ नोव्हेंबर २०११च्या शासन निर्णयानुसार अनुदानाच्या निकषात बदल करण्यात आला. गुणवत्ता (५०), भौतिक सुविधा (३५) यासोबतच समुपदेशन (३), सामाजिक विकास उपक्रम (३), सहशालेय उपक्रम (५) आणि इको फ्रेंडली रेन वॉटर पारंपारिक ऊर्जा आणि पाण्याचा पुनर्वापर (४) अशी १०० गुणांची रचना झाली. मुळातच कोणतीही शैक्षणिक संस्था चालवण्यासाठी धर्मादाय आयुक्त आणि सार्वजनिक न्यास यांच्या १८६० आणि १९५०ची नोंदणी असणाऱ्या संस्था असणे आवश्यक आहे. त्यानंतर शाळेच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणे, इमारत व अन्य भौतिक सुविधा, फर्निचर, ग्रंथालय, प्रयोगशाळा, क्रीडा साहित्य या गोष्टींसाठी खूप मोठी प्रक्रिया आणि आर्थिक गुंतवणूक करावी लागते. तसेच शिक्षक नियुक्ती व मासिक वेतन हाही भाग आहेच. राज्याच्या एकूण शिक्षण व्यवस्थेचा विचार केल्यास प्राथमिक शाळा बहुतेक करून शासकीय नसून त्या अर्धशासकीय म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आहेत. तर, संपूर्ण महाराष्ट्रात काही स्थानिक स्वराज्य संस्थांचा अपवाद वगळता सराव पाठशाळा आणि पाच शासकीय विद्यानिकेतने सोडून संपूर्ण माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण खासगी संस्थांच्या शाळांतूनच देण्यात येते. शिक्षणाची तळमळ असणाऱ्या संस्थांनी शिक्षण तळागाळापर्यंत पोहोचावे, यासाठी खासगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांचे प्रभावी जाळे निर्माण केले. वाडी वस्तीपर्यंत शिक्षण पोहोचण्यासाठी वस्ती शाळा, साखर शाळा यांचीही निर्मिती झाली. पण हे करून आपण चूक केली की काय, असा प्रश्न संस्थांच्या मनात यावा, अशी स्थिती शासनाच्या अनेक ध्येय-धोरणांमुळे निर्माण झाली आहे.

**- महेंद्र गणपुले**

# पालकांच्या मानगुटीवर इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे भूत..?







गेल्या काही वर्षात महाराष्ट्राच्या शहरी आणि ग्रामीण भागात विनाअनुदानित इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे पेव फुटले. इंग्रजी माध्यमाच्या शाळेत आपले मूल शिकले तरच त्याला भावी जीवनात काही भवितव्य असल्याचा भ्रम अभिजात मराठी भाषेचे झेंडे नाचवणाऱ्या पालकांना झाला आणि इंगजी माध्यमाच्या 'स्कूल 'चे पीक साऱ्या महाराष्ट्रात बघता बघता फोफावले. पालकांच्या याच मानसिकतेचा फायदा उठवत गल्लीबोळात नवे शिक्षणसम्राट निर्माण झाले. शैक्षणिक संस्था, विश्वस्त संस्था स्थापन करून पालकांची फसवणूक करत त्यांनी राजरोसपणे लूट करण्याचा शैक्षणिक धंदा बरकतीला आला.

दरमहा लाखो रुपये कमावणाऱ्या या इंग्रजी माध्यमाच्या शाळांच्या संस्थाचालकांनी पालकांची फसवणूक करण्यासाठी राजरोसपणे वेगवेगळे उद्योग सुरू केले. नवे प्रचार तंत्र अंमलात आणले. या विनाअनुदानित इंग्रजी माध्यमाच्या शाळा आंतरराष्ट्रीय दर्जाच्या आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या असल्याचा भ्रम निर्माण करण्यासाठी या शाळांचे अनेक संस्थाचालक अत्यंत धूर्तपणे आपल्या शाळांच्या नावात इंटरनॅशनल, ग्लोबल, युनिव्हर्सल, वर्ल्ड, युरो अशी विशेषणे वापरायला सुरुवात केली. आपल्या शाळांचे असेच नामकरण केले. परिणामी तथाकथित इंटरनॅशनल, ग्लोबल, स्कूलचे चालक पालकांकडून अवाच्या सवा फी वसूल करण्यास सोकावले.

सर्वसामान्य जनतेला राजरोसपणे लुटायला सोकावलेल्या संस्था चालकांना आता महाराष्ट्र सरकारने कायदेशीरपणे चाप लावत अशी विशेषणे वापरायला इंग्लिश मीडियम स्कूलच्या चालकावर कायदेशीर बंदी लागू केली आहे. महाराष्ट्र सरकारच्या शिक्षण संचालकांच्या आदेशानुसार आता अशा संस्था चालकांना आपल्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या नावात इंटरनॅशनल, ग्लोबल असे पालकांना आकर्षित करणारे शब्दविशेषणे वापरता येणार नाहीत. ५०-६० वर्षांपूर्वी महाराष्ट्रासह देशभरात खिश्चन धर्मीयांच्या विश्वस्त संस्थांकडून चालवल्या जाणाऱ्या इंग्रजी माध्यमांच्या शाळा कॉन्व्हेंट असे विशेषण वापरत असत.

पण कॉनव्हेंटच्या शाळांबद्दल समाजात विशेष आकर्षण असल्याने अनेक विनाअनुदानित इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या संस्था चालकांनी आपल्या शाळां कॉन्व्हेंट असल्याची दिशाभूल सुरू केली. काही इंग्रजी माध्यमांच्या शाळांनी सैनिकी प्रशिक्षण देणाऱ्या शाळा अशी जाहिरातबाजी सुरू केली. इंग्रजी माध्यमाच्या या धंदेवाईक संस्था चालकांचा असे शब्द वापण्याचा उद्देश आपल्या शाळांचा शैक्षणिक दर्जा जागतिक असावा,

यापेक्षा असे शब्द वापरून पालकांची लुबाडणूक करणे हाच असल्याने राज्य सरकारने अशा संस्था चालकांना वठणीवर आणण्यासाठी हे नवे आदेश अंमलात आणले आहेत. यापुढे आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाची मान्यता असेल तरच त्या संस्थांना ही शब्दविशेषणे वापरता येतील. सैनिकी मंडळाची मान्यता असेल तरच सैनिकी शाळा असे संबोधन वापरता येईल, अन्यथा अशा शब्दांचा बेकायदा वापर करणाऱ्या शिक्षण संस्थांविरुध्द कायद्याचा बडगा उगारला जाईल.

महाराष्ट्रात अगदी ग्रामीण भागापर्यंत सुरू झालेल्या या इंग्रजी माध्यमाच्या शाळांत आंतरराष्ट्रीय शिक्षण दिले जात नाही. अशा बहुतांश शाळांत आंतरराष्ट्रीय दर्जाचा शैक्षणिक अभ्यासक्रमही नाही. पात्र शिक्षकही नाहीत, तरीही पालकांत चुकीचा समज निर्माण करून या शाळा दरमहा ५ ते १५ हजार रुपयांपर्यंतची तर काही शाळा वर्षाला दोन ते तीन लाख रुपये फी घेत असल्याचे यापूर्वी चव्हाट्यावर आले आहे. शिक्षणाच्या पवित्र क्षेत्रात आलेला हा बाजारूपणा पालकांच्या चुकीच्या मानसिकतेने अधिक वाढला आणि इंग्रजी माध्यमाच्या संस्था चालकांना पैसा कमवण्यासाठी रान मोकळे झाले. आता इंटरनॅशनलसह सीबीएससी असे शब्दही संबंधित शिक्षण मंडळांची मान्यता नसल्यास वापरता येणार नाही. पालकांची फसवणूक बंद व्हावी यासाठी राज्य सरकारने हा कायदेशीर बडगा उगारला असला तरी इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे भूत मानगुटीवर बसलेले पालक कधी जागे होणार...?

# मस्तवाल 'जयस्वाल'

मुंबई मधील मोतीलाल नगर झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्प म्हाडा तर्फे राबविण्यात येत आहे आणि यासाठी अदाणी समुहाला ३६ हजार कोटी रुपयांचे कंत्राट देण्यात आले आहे. याच संदर्भात येथील रहिवाशांच्या तक्रारी ऐकुन घेण्यासाठी म्हाडा तर्फे जनसभेचे आयोजन करण्यात आले होते. म्हाडाचे उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल हे यावेळी सभेला संबोधत होते, यावेळी एक युवकाने हातात फलक धरुन सोळाशे ऐवजी चोवीसशे स्केअर. फुटाचे घर मिळावे असे पोस्टर धरुन जयस्वाल यांचे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न करत होता, त्यावेळी अचानक पणे जयस्वाल यांच्यातील अधिकारी जागा झाला आणि त्यांचा इगो दुखावला, याची परिणती म्हणजे भरसभेत



जयस्वाल यांचा पारा चढला आणि त्यांनी त्या युवकाला अपशब्द वापरले एवढेच नव्हे तर पोलिस यंत्रणेला आदेश देऊन त्यांचे ओळख पत्र तपासुन ते ताब्यात घेतले. केवळ दाढीवाला सारखा दिसला म्हणून त्यांनी त्याला अगर तु घुसपैठी निकला तो तेरे को यहाँ से ऊठवा लुंगा अशी सडकछाप भाषा वापरली. वास्तविक ही भाषा वरिष्ठ पदावर असलेल्या आयएसआय अधिकाऱ्याला न शोभणारीच होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानुसार ते रहिवाशांचे म्हणणे ऐकायला आले होते, समस्या जाणून घ्यायला आले होते, त्यांच्या शंकांचे निराकरण करणे ही त्यांची जबाबदारी आहे त्यासाठीच तर त्यांना जनतेच्या तिजोरीतुन भलामोठा पगार दिला जातो सोयीसुविधा दिल्या जातात. १९९६ सालच्या बॅचचे अधिकारी असलेले जयस्वाल यांनी आजवर अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत. त्यांनी वापरलेली भाषा कुणालाही रचलेली नाही. खासदार वर्षा गायकवाड, आमदार प्रवीण दरेकर यांनी याबाबत नाराजी व्यक्त केली आहे. जयस्वाल हे वादग्रस्त अधिकारी म्हणून ओळखले जातात. कोव्हिड काळात सेंटर घोटाळ्याप्रकरणी ईडीने त्यांच्या घरावर छापेमारी केली होती. या प्रकरणात त्यांच्याकडे १५ कोटींच्या मुदत ठेवी आढळून आल्याचा आरोप आहे. त्याच बरोबर निवृत्त वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांने देखील त्यांच्या विरोधात पोलिस तक्रार केली होती.

जनतेचे, जनतेने, जनतेसाठी चे सरकार म्हणजेच आपली लोकशाही व्यवस्था आणि ही लोकशाही ऊभी आहे राज्यव्यवस्था, कार्यपालिका, न्यायपालिका या तीन स्तंभावर,लोकशाहीत प्रजा, जनता ही मालक आहे आणि लोकप्रतिनिधीं, नोकरशहा हे सेवक आहेत. मात्र गेल्या काही वर्षांपासून पद, अधिकार, हे आपल्या कडे आहे म्हणजेच आपणच मालक आहेत या मानसिकतेतून लोकप्रतिनिधीं आणि नोकरशहां वागत आहेत आणि विशेष म्हणजे दोघांचे अधिकार, जबाबदारी, कर्तव्य, हे वेगवेगळे असले तरी दोघांची भ्रष्ट युती झाली आहे आणि पदाचा, अधिकाराचा सदुपयोगापेक्षा दुरुपयोगच अधिक होत आहे, आणि मनमानी पद्धतीने कारभार सुरू आहे हे अनेकदा अधोरेखित होत आले आहे.आपण सगळे भाऊ भाऊ मिळून सारे लुटून खाऊ अशीच परिस्थिती जिकडेतिकडे दिसते आहे आणि यात राजकारणी - वरिष्ठ नोकरशहां यांची युती ही महत्त्वाची ठरते. जयस्वाल यांच्या सारख्या अधिकाऱ्यांकडे करोडोंची माया जमली कशी? याचे उत्तर मात्र जनतेला मिळाले नाही कारण नोकरीत असतांना असे नोकरशहां राजकारण्यांची मर्जी राखुन काम करतात आणि सर्व पक्षीय राज्यकर्ते त्यांना सांभाळून घेतात आणि कधीकधी निवृत्ती नंतर त्यांची लाभाच्या पदावर सोय देखील लावतात. त्यामुळे भ्रष्टाचाराचे कितीही प्रकरणे बाहेर आली तरी ना कोणाला कायद्याचा धाक ना शिक्षेची भिती. मस्तवाल जयस्वाल सारखे जागोजागी अनेक आहेत. विशेष म्हणजे मोतीलाल नगरचा विकास अदाणी समुह करत आहेत यातच सगळे काही आले. आपण जणु अदाणी यांच्या साठी काम करत आहोत अशा आविर्भावात त्यांनी अदाणींना सांगुन प्रकल्प रद्द करण्याची धमकी दिली. सकीय कार्यालयात अगदी खालच्या कर्मचाऱ्यांपासुन वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत सर्वत्र ही प्रवृत्ती मोठ्याप्रमाणावर फोफावली आहे. राजकारणी असो कि नोकरशहां हे जनतेला गृहित धरून ज्या पद्धतीने वागणुक देतात ते लोकशाही व्यवस्थेत अपेक्षित नाही. पुर्वी राज्याचा कारभार होत असलेल्या इमारतीचे नाव सचिवालय होते ते बदलुन मंत्रालय करण्यात आले मात्र त्यामुळे ना राज्यकर्त्यांची ना नोकरशहां ची मानसिकता बदलली ना कार्यपद्धती बदलली. राज्यकर्त्यांच्या मर्जीतील अधिकारी आणि क्रिम पोस्टिंग साठी काय काय केले जाते हे ये पब्लिक है ये सब जानती है. मंत्र्याना विशेष कार्यकारी अधिकारी का लागतो आणि एका विशिष्ट अधिकाऱ्यांसाठी हट्ट का धरला जातो तसेच एखाद्या अधिकाऱ्याला वारंवार मुदतवाढ का दिली जाते यातच सगळे काही आले. अधिकाऱ्यांमधे एवढा 'मस्तवाल' पणा येतो कुठुन?. आता त्यांना समज दिली आहे, असे सांगून प्रकरणावर पडदा टाकला जाईल,आणि ऊद्या आणखी एखादा अधिकारी जनतेशी मस्तवालपणा करेल.

**- अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

## रिल कूळ

आज काल रिलस्टार
किती घाले धुमाकूळ
उशीर नव्या रिल्सला
होऊनजाती व्याकूळ

थांगपत्ता नाहीलागत
कुठून लागले हे खूळ
त्याचत्याच विषयावर
गु-हाळ काढतो गूळ

उगाचं उठवे वावटळ
डोळ्यांत घुसडी धूळ
रिल कुणाभाव खाई
लगेचं उठले पोटशूळ

भरकटून कधीगाड्या
सोडून धावतात रूळ
अल्पावधित प्रसिद्धी
असू शकतो हेतू मूळ

वादग्रस्त कधी काही
अंतरंगास करे गढूळ
हव्यास प्रसिद्धीसाठी
स्वच्छ जल हो मचूळ

एकामागे अनेकमुंग्या
बनवले केवढे वारुळ
पेरु लागे बीज आपले
असू द्या जमीन मरुळ

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# नेपाळमधील क्रांतिकारक निर्णय...



नेपाळमध्ये बालेनं शहा यांनी सत्ता पंतप्रधान म्हणून हाती घेतली आहे. ते केवळ ३५ वर्षाचे पंतप्रधान आहेत.

जगातील सर्वात तरुण राष्ट्रप्रमुख म्हणून त्यांचा गौरव आहे. त्यांनी विद्यार्थी आंदोलनात भाग घेतला होता व नेपाळमधील सत्ता हाती घेतली होती. त्यांनी नेपाळमधील काठमांडू शहराचे महापौर म्हणून काम केले होते. सत्तेवर आल्यानंतर त्यांनी राज्यातील खाजगी शाळा बंद केल्या व सरकारी शाळांना पुनर्जीवन दिले.

सरकारी कर्मचाऱ्यांना दर १५ दिवसांनी पगार देण्याचे अर्थमंत्र्यांनी ठरविले आहे. मासिक वेतन देण्याची परंपरा आता मोडीत निघणार आहे. या निर्णयाचे नेपाळमधील कर्मचाऱ्यांनी स्वागत केले आहे. सरकारी कर्मचाऱ्यांच्या हातात अधिक वेळा पैसे आल्यास खर्चात वाढ होऊ शकते. त्याचा अर्थव्यवस्थेवर सकारात्मक परिणाम होऊ शकतो नेपाळमध्ये अनेक क्रांतिकारक निर्णय शहा यांनी घेतले आहेत. कारभारातील भ्रष्टाचार निपटून काढण्याचा त्यांचा मानस आहे. नेपाळमधील निर्णय स्वागतार्ह आहे.

**- शांताराम वाघ, पुणे.**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

# पेण तालुक्यात अवकाळी पावसाचा तडाखा

## लग्नसराई, वीटभट्टी व आंबा बागांचे मोठे नुकसान

**अक्षराज : मितेश जाधव**



**दि.२१, पेण (रायगड) :** रायगड जिल्ह्यातील पेण तालुका ग्रामीण भागात आज सकाळपासून अचानक अवकाळी पावसाने मेघगर्जनेसह हजेरी लावली. पहाटेपासूनच ढगाळ वातावरण झाले होते. सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास जोरदार सरी कोसळल्या. या अनपेक्षित पावसामुळे लग्नसराईचे कार्यक्रम, वीटभट्टी व्यवसाय आणि आंबा बागांचे मोठे नुकसान झाल्याची माहिती समोर येत आहे. सकाळी वातावरणात अचानक बदल होऊन ढगांची दाटी वाढली आणि काही वेळातच मुसळधार पावसाने सुरुवात झाली. ऐन लग्न सराईत अवकाळी पाऊस पडल्याने मोठी तारांबाला उडाली ग्रामीण भागातील अनेक ठिकाणी लग्नसोहळ्यांसाठी उभारलेले मंडप, सजावट आणि इतर साहित्य पावसामुळे भिजले. अनेक कुटुंबांचे नियोजन विस्कळीत झाले असून, आर्थिक फटका बसल्याची भावना व्यक्त केली जात आहे. दरम्यान, वीटभट्टी व्यवसायिकांनाही या अवकाळी पावसाचा मोठा फटका बसला आहे. उन्हात वाळवण्यासाठी ठेवलेल्या कच्च्या विटा पावसाने भिजल्या असून वीट भट्टी व्यवसायाचे, हजारो विटांचे नुकसान झाले आहे. यामुळे या व्यवसायावर अवलंबून असलेल्या कामगारांपुढे आर्थिक संकट उभे ठाकले आहे. तसेच, तालुक्यातील आंबा बागांनाही या पावसाचा मोठा फटका बसला आहे. सध्या आंब्याचा हंगाम सुरू असताना अचानक पडलेल्या पावसामुळे झाडांवरील फळे गळून पडली, तर काही ठिकाणी आंब्यांना डाग व सड येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर परिणाम होणार असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. एकूणच, अवकाळी पावसाने पेण तालुका ग्रामीण भागातील जनजीवन विस्कळीत करत विविध घटकांना मोठा आर्थिक फटका दिला आहे.

# तायक्वॉंदो असोसिएशन ऑफ सबर्बन मुंबईची वार्षिक सर्वसाधारण सभा (AGM) १ मे रोजी

**अक्षराज : संदिप येवले**

**दि.२१, घाटकोपर (मुंबई) :** तायक्वॉंदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, मुंबई या अधिकृत राज्य संघटनेशी संलग्न असलेली तायक्वॉंदो असोसिएशन ऑफ सबर्बन मुंबईची वार्षिक सर्वसाधारण सभा - AGM शुक्रवार, दिनांक ०१ मे २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता टागोरनगर मित्र मंडळ हॉल, विक्रोळी पूर्व येथे तायक्वॉंदो असोसिएशन ऑफ सबर्बन मुंबईचे अध्यक्ष संदिप येवले यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे. सदर मिटिंगसाठी तायक्वॉंदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, मुंबई चे सचिव,आंतरराष्ट्रीय पंच सुभाष पाटील हे उपस्थित राहणार असून तायक्वॉंदो असोसिएशन ऑफ सबर्बन मुंबईचे सचिव संदिप चव्हाण यांनी सर्व संलग्न अकॅडमींना, सभासद यांना वेळेवर हजर राहण्यासाठी सांगण्यात आले आहे. अधिक माहिती साठी संपर्क - संदिप चव्हाण (सचिव)-८१६९६५६१८८,कल्पेश गोलांबडे(खजिनदार)-९५९४५९४४५५.

# सरकारी कर्मचारी संपामुळे नवी मुंबई आरटीओ कार्यालयात सुकसूकाट

**अक्षराज : गणेश जाधव**

**दि.२१, नेरूळ (नवी मुंबई) :** विविध मागण्यांसाठी राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना आणि राज्य सरकारी गट-ड (चतुर्थ श्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाने मंगळवार, दिनांक २१ एप्रिल २०२६पासून बेमुदत संपाची घोषणा केली आहे. त्यामुळे आजपासून राज्यभरातील शासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. यापार्श्वभूमीवर राज्य सरकारने सर्व कार्यालयांना महत्वाच्या सूचना दिल्या आहेत. संपाच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाने परिपत्रक काढले असून त्यामध्ये सर्व मंत्रालयीन विभाग तसेच त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयांना उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्याचप्रमाणे संपकरी कर्मचाऱ्यांना ही शिस्तभंगाच्या कारवाईचा, तसेच संपकाळातील वेतन न देण्याचा इशारा दिला आहे, मंगळवार पासून बेमुदत संपाची घोषणा केली आहे. त्यामुळे आजपासून राज्यभरातील शासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. यापार्श्वभूमीवर राज्य सरकारने सर्व कार्यालयांना महत्वाच्या सूचना दिल्या आहेत.

**काम नाही वेतन नाही**

शासकीय कर्मचा-यांच्या संपाबाबत केंद्र शासनाचे काम नाही वेतन नाही हे धोरण राज्य शासनही अनुसरत असल्याचे कर्मचा-यांना अवगत करावे, अशा सूचना सरकारने विभागप्रमुखांना दिल्या आहेत. त्यामुळे संपकाळातील वेतन न मिळण्याची टांगती तलवार संपकरी कर्मचाऱ्यांवर असणार आहे.ज्या शासनाच्या सेवा महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा अधिनियमांतर्गत घोषित करण्यात आल्या आहेतअशा सेवांबाबत कर्मचाऱ्यांना अवगत करावे, जे कर्मचारी संपावर जातील त्यांच्याविरुद्ध सदर अधिनियमांतर्गत कार्यवाही करण्यात यावी.

सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांमध्ये संप काळात अत्यावश्यक व इतर सेवा सुरळीत चालू राहतील याबाबत उपाययोजना कराव्यात, अशा सूचना ही सरकारने दिल्या आहेत.

# पंढरपूर विकास आराखड्याच्या कामास गती देण्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांचे निर्देश

## वारकरी भाविकांना अडचणी येऊ नयेत याची दक्षता घ्यावी - मुख्यमंत्री

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२१, मुंबई :** आषाढी वारी काळात निघणाऱ्या श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग व श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांना चांगल्या सुविधा मिळण्यासाठी दोन्ही पालखी मार्गावरील पालखीतळे अधिक चांगली व सुविधायुक्त करण्यात यावीत, वारकरी भाविकांना अडचणी येऊ नयेत याची दक्षता घ्यावी तसेच पंढरपुरात येणाऱ्या भाविकांना व स्थानिक नागरिकांना पायाभूत सुविधा मिळाव्यात यासाठी पंढरपूर विकास आराखड्याच्या कामास गती द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

पालखी मार्गांवरील विशामस्थळ सुविधा निर्मिती संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृहात बैठक झाली. यावेळी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल आदी यावेळी उपस्थित होते.

पुणे विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार यांनी सादरीकरणाद्वारे श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग व श्री संत तुकाराम महाराज पालखी मार्गातील



विविध विकास कामांची माहिती दिली.

श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग व श्री संत तुकाराम महाराज पालखी मार्गातील विविध विकास कामांसाठी सुमारे १३०३ कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला होता. त्यापैकी ९६४ कोटी रुपये मंजूर झाले असून त्यातील ९५९ कोटी रुपये खर्च झाले आहेत. या आराखड्यांतर्गत दोन्ही पालखी मार्गातील पालखीतळांच्या ठिकाणी स्वच्छतागृहांसाठी सेप्टी टँक, कमानीचे बांधकाम करणे, जमीन सपाटीकरण करणे, हायमास्ट पोल उभारणे, संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे, रस्त्यांची दुरुस्ती, पालखी कट्टा तयार करणे आदी कामांपैकी बहुतांश कामे पूर्ण झाली असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, यंदा २५ जुलै रोजी आषाढी एकादशी आहे. श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे प्रस्थान ८ जुलै रोजी तर श्री संत तुकाराम महाराज पालखीचे प्रस्थान ७ जुलै रोजी होणार आहे. दोन्ही पालखी मार्गावर वारकरी भाविकांना कोणत्याही अडचणी येऊ नयेत याची दक्षता घ्यावी.

पालखी सोहळ्याच्या विश्वस्तांशी चर्चा करून त्यांना आणखी कोणत्या सुविधा हव्यात त्या करून द्याव्यात. पालखी तळावर कायमस्वरुपी पायाभूत सुविधांची कामे करावीत. पालखी तळावर वारकऱ्यांसाठी गेल्या वर्षी हॅंगरची व्यवस्था करण्यात आली होती, त्या प्रमाणे यंदाही अतिरिक्त हॅंगरची व्यवस्था करावी. पालखी मार्गावरील महामार्गांची अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करावीत.

पुलकुंडवार म्हणाले की, पालखी मार्गावरील विकास कामे पूर्ण करण्यात येत असून यावर्षी वारकऱ्यांना कोणत्याही अडचणी येणार नाहीत, याची दक्षता घेतली आहे. गेल्या वर्षी दोन्ही पालखी मार्गावर ३७०० मोबाईल शौचालये पुरविण्यात आली होती. यंदा ५ हजार मोबाईल शौचालये पुरविण्याचे नियोजन आहे.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या वतीने दोन्ही पालखी मार्गावरील महामार्गाची कामे जवळपास पूर्ण होत आली आहेत. दिवेघाट ते हडपसर आणि बारामती ते इंदापूर मार्गांची कामे सुरू आहेत, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ.के.एच.गोविंदराज, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव पराग जैन, सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव ई रवींद्रन, सोलापूरचे जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस., मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी, उपमुख्यमंत्री महोदय यांचे सचिव राजेश देशमुख, राष्ट्रीय महामार्ग विभागाचे प्रकल्प संचालक संजय कदम आदी उपस्थित होते.

# ऐन उन्हाळ्यात ठाण्यात पुन्हा पाणीबाणी

## कळवा, मुंब्रा आणि दिव्यात पाणी पुरवठा २४ तास बंद राहणार

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२१, ठाणे :** ठाण्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जांभूळ जलशुद्धीकरण केंद्रात तातडीची दुरुस्ती आणि ठाण्यातील जलवाहिन्यांच्या उन्नतीकरणाचे काम करण्याचे असल्याने ठाण्यातील काही महत्वाच्या भागात पुढील काही दिवस म्हणजेच गुरुवार, दिनांक २३ आणि शुक्रवार, दिनांक २४ एप्रिल २०२६ रोजी पाणी पुरवठा बंद राहणार असल्याने या भागातील नागरिकांना पाणी टंचाईला तोंड द्यावे लागणार आहे. माजिवडा भागात गेले काही दिवस पाणी गळती होत आहे.या दोन दिवसात ही गळती रोखण्याचे काम देखील होणार आहे.

पाणी हेच जीवन आपण नेहमीच म्हणतो, पण हेच पाणी जेव्हा नळाला येत नाही,तेव्हा कुठं आम्हाला या पाण्याची किंमत कळते.नेमका हाच मनस्ताप ठाण्यातील काही भागातील नागरिकांना पुढील काही दिवस या आव्हानाचा सामना करावा लागणार आहे. याच दरम्यान कळवा,मुंब्रा आणि दिव्यासारख्या दाट लोकवस्तीच्या परिसरात तब्बल २४ तास पाणी




पुरवठा बंद राहणार आहे.

दरम्यान मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी (२३ एप्रिल) दुपारी १२ वाजल्यापासून पाणी कपात सुरू होईल, जी शुक्रवारी (२४ एप्रिल) दुपारी १२ वाजेपर्यंत कायम असेल. उन्हाळ्याचे दिवस सुरू असल्याने पाण्याची गरज वाढलेली असतानाच हे ही पाणीकपात आल्याने गृहिणींची मोठी कसरत होणार आहे.

दरम्यान या शटडाऊनचा सर्वाधिक फटका दिवा, मुंब्रा (प्रभाग क्र. २६ आणि ३१ चा काही भाग वगळून) आणि कळवा प्रभाग समितीच्या सर्व भागांना बसणार आहे. याशिवाय वागळे प्रभाग समितीमधील कोलशेत खालचा गाव या भागातही पाणी येणार नाही. माजिवडा-मानपाडा परिसरातील काही भागांतही याचा परिणाम जाणवेल.

पाणीपुरवठा बंद राहिल्यानंतर जेव्हा तो पुन्हा सुरू होतो, तेव्हा सुरुवातीला दाब कमी असतो. त्यामुळे शुक्रवारी पाणी आल्यानंतरही पुढील एक-दोन दिवस कमी दाबाने पुरवठा होण्याची शक्यता आहे. अशा वेळी ऐनवेळी गोंधळ नको असेल, तर आजच पिण्याच्या आणि वापराच्या पाण्याचा पुरेसा साठा करून ठेवणे शहाणपणाचे ठरणार आहे.

**पाणीपुरवठा विभागाचे आवाहन**

महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, या काळात पाण्याचा वापर अत्यंत काटकसरीने करावा. पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवणं आता आपल्याच हातात आहे. केवळ काम आहे म्हणून नाही, तर एक सामाजिक जबाबदारी समजून ठाणेकरांनी पालिकेला सहकार्य करणे गरजेचे आहे. त्यामुळे बादल्या, पिंप भरून ठेवा आणि विनाकारण पाण्याचा अपव्यय टाळा!

# दक्षिण सोलापूरात पाण्यासाठी प्रतीक्षा; भीमा नदीत उजनीचे पाणी सोडण्यास विलंब


## वाळू उपसा महत्वाचा की लोकांची तहान? नागरिकांचा सवाल

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.२१, सोलापूर :** दक्षिण सोलापूर तालुक्यातील भीमा नदीपात्रात अद्याप उजनी धरणाचे पाणी सोडण्यात आले नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. उन्हाची तीव्रता वाढत असताना गावोगावी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असून विहिरी व बोअरवेल कोरड्या पडण्याच्या मार्गावर आहेत.

उजनी धरण येथून भीमा नदीत पाणी सोडण्याबाबत प्रशासनाकडून अद्याप स्पष्ट निर्णय झाला नसल्याचे चित्र आहे. पाणी साठ्याचे नियोजन, शेतीसाठी राखीव पाणी व पुढील हंगामाचा विचार या कारणांमुळे विलंब होत असल्याचे अधिकृत सूत्रांकडून सांगितले जात आहे.

मात्र, स्थानिक नागरिक यावर समाधानी नाहीत.



पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर असताना पाणी सोडण्यास उशीर का? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. काही ठिकाणी टँकरवर अवलंबून राहावे लागत असून महिलांना पाण्यासाठी लांब अंतर पायी जावे लागत आहे. दरम्यान, भीमा नदीपात्रात सुरू असलेल्या वाळू उपशामुळेच पाणी सोडण्यात विलंब होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे. अधिकृत पातळीवर याबाबत कोणतीही पुष्टी नसली तरी वाळू उपसा महत्वाचा की लोकांची तहान? असा संतप्त सवाल नागरिकांकडून विचारला जात आहे.

प्रशासनाने या परिस्थितीकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने भीमा नदीत पाणी सोडावे, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे. अन्यथा येत्या काही दिवसांत आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

दरम्यान, संबंधित विभागाने पाण्याच्या उपलब्धतेचा आढावा घेऊन लवकरच निर्णय घेण्यात येईल, असे संकेत दिले असले तरी प्रत्यक्षात पाणी कधी सोडले जाणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# खापरखेडा येथे सत्यशील बुद्ध विहारात भीम गीतांचा जल्लोष

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२१, नागपूर :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंती महोत्सव २०२६ निमित्त सत्यशील बुद्ध विहार खापरखेडा येथे भीम-बुद्ध जयंती उत्सव समितीर्फे भव्य भीम गीतांचा संगीतमय कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी सुप्रसिद्ध तडफदार गायक विकास राजा व त्यांच्या संचाला प्रमुख प्रबोधनकार म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भाऊसाहेब बोरकर यांनी भूषविले. कार्यक्रमाच्या प्रारंभी खापरखेडा कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनचे अध्यक्ष दिलीप बनसोड, पृथ्वीराज बागडे, माजी सरपंच प्रकाश लांजेवार, भीमराव आवळे, राहुल बागडे, भीमराव तागडे, राजेश देशभ्रतार, किशोर बनसोड, सुरेंद्र वाहने, राजेंद्र शेंडे, अजय ढोरे, विठ्ठल झोडापे तसेच महिला मंडळाच्या अध्यक्षा गंगाबाई लोखंडे, किरणताई शेंडे, अंतकलाताई गाडेकर आदींच्या उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर व रमाई यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करण्यात आले. यानंतर मान्यवरांचा सत्कार व स्वागत सोहळा पार पडला. त्यानंतर विकास राजा व त्यांच्या संचाच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली. त्यांच्या दमदार सादरीकरणाने १०१ शेरोशायरी आणि तडफदार भीम गीतांनी संपूर्ण परिसर दुमदुमून




गेला. आपल्या प्रबोधनातून त्यांनी जो स्वतःच्या स्वार्थ साध्य करण्यासाठी समाजामध्ये तेढ निर्माण करतो व बाबासाहेबांच्या विचारांशी गद्दारी करतो त्याचे सत्यानाश झाल्या शिवाय रहात नाही असा संदेश दिला. या कार्यक्रमाला सुमारे हजारो बौद्ध उपासक-उपासिका तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विकास राजा यांच्या तडफदार भीमगीतांवर युवा कार्यकर्ते उत्साहाने सहभागी होत होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भीम-बुद्ध जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष राजेंद्र मेश्राम, उपाध्यक्ष धीरज देशभ्रतार, बंडू शंभरकर, रवी शेंडे, भीमराव पाटील, विकास गेडाम, आशिष धनविजय, अभिषेक शेंडे, धम्मदीप झोडापे, अभय मानवटकर, पवन गजभिये, प्रज्वल राऊत, प्रज्वल लांजेवार, अमित रंगारी, विदित गजभिये, यश देशभ्रतार, अनिकेत लांजेवार, सम्यक लांजेवार, सिद्धांत देशभ्रतार, प्रतीक उके आदींनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी उत्कृष्ट ग साउंड व्यवस्था पवन गजभिये (ग थरथ्रपळल) यांनी उपलब्ध करून दिला. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन वर्षा शेंडे यांनी केले तर धीरज देशभ्रतार यांनी आभार प्रदर्शन केले. एकूणच या भव्य कार्यक्रमामुळे सत्यशील बुद्ध विहार परिसरात जल्लोषमय व भीममय वातावरण निर्माण झाले होते.

# खापरखेडा औष्णिक वीज केंद्रात कामगारांचा हृदयविकाराने मृत्यू

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२१, नागपूर :** खापरखेडा औष्णिक वीज केंद्रा अंतर्गत बाष्पक संधारण विभागात कार्यरत असलेल्या कामगाराचा हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना मंगळवार, दिनांक २१ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजता घडल्याने कामगार वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. अनंता शेंडे वय ४१ रा. सिल्लेवाडा वस्ती असे मृत कामगाराचे नाव आहेमृतक अनंता शेंडे यांचे सौसर तालुक्यातील अंबाडी गावाचे आहेत. मागील काही वर्षांपासून सिल्लेवाडा येथे आपल्या सासऱ्याकडे कुटुंबासह राहत होते. मृतक अनंता शेंडे हे मे. एम. टेक. पॉवर या कंपनी अंतर्गत अस्थायी कामगार म्हणून कार्यरत होते. २१ एप्रिल मंगळवारला बाष्पक संधारण विभागात कर्तव्यावर असताना अनंता शेंडे यांनी



कोळसा मिल डेक स्प्रिंगला लॅमिनेशन टेपने कव्हरिंग करण्याचे आपले काम पूर्ण केले होते.

काम संपवून परत येत असताना २१० मेगावॅट संचाच्या बीसी फोर सीएमआर (BC4 CMR) टनेलच्या म ायनस लेव्हलवर ते अचानक जमिनीवर कोसळले व बेशुद्ध झाले. सदर घटनेची माहिती मिळताच वीज केंद्र प्रशासनाने त्यांना तातडीने खापरखेडा औष्णिक वीज केंद्राच्या रुग्णालयात दाखल केले.

प्राथमिक उपचार केले. यावेळी गांभीर्य लक्षात घेऊन मॅक्स रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. प्राथमिक माहितीनुसार अनंता शेंडे यांचा मृत्यू हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने झाला असल्याचे सांगण्यात आले आहे. या घटनेला उपमुख्य अभियंता नितीन रोकडे यांनी दुजोरा दिला असून वीज केंद्र प्रशासनाच्या वतीने एक प्रसिद्धी पत्रक जाहीर केले आहे. मृतक अनंता शेंडे यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी नागपूर येथील शासकीय मेयो रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. शवविच्छेदना नंतरच खरे काय ते कळणार आहे.

**कंत्राटी कामगार संघटनेच्या बैठकीत निघाला तोडगा**

२१० मेगावॅट वीज केंद्राच्या सर्व्हिस बिल्डिंगमध्ये कंत्राटी कामगार संघटना व वीज केंद्र अधिकाऱ्याची दुपारीच्या सुमारास संयुक्त बैठक झाली सदर बैठकीत म हानिर्मितीच्या सीएसआर फंडातून ४ लाख रुपये, कंत्राटदारांकडू २ लाख रुपयांचा धनादेश, ५० हजार रुपये मैय्यत फंड व मृतक कामगारांच्या पत्नीला नोकरी देण्याचा निर्णय घेण्यात आला. यावेळी मुख्य अभियंता विवेक रोकडे, उपमुख्य अभियंता सचिन डेगवेकर, कार्यकारी अभियंता संदीप देवगडे, कल्याण अधिकारी आनंद वाघमारे, वैद्यकीय अधिक्षक डॉ मुकेश गजभिये, कंत्राटदार प्रतिनिधी विनोद लोखंडे, कंत्राटी कामगार संघटना नेते रोशन गोस्वामी, भुपेंद्र चतुर्वेदी, प्रवीण हाते, विनोद बन्सोड, विलास गुजरमाळे यांच्यासह पावर फ्रंट कामगार युनियन व भारतीय मजदूर संघ प्रतिनिधी हजर होते.

## थोडक्यात

### जुईनगरमध्ये साई पालखी सोहळा संपन्न; शेकडो भाविकांचा सहभाग



**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.२०, जुईनगर (नवी मुंबई) :** जुईनगर सेक्टर १३ येथील साईबाबा मंदिरात पादुका पूजन, पालखी सोहळा व साई भंडाऱ्याचे भव्य आयोजन नुकतेच पार पडले. या धार्मिक कार्यक्रमाला परिसरातील शेकडो भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत भक्तीमय वातावरण निर्माण केले.कार्यक्रमाची सुरुवात साईबाबांच्या पादुकांच्या पूजनाने झाली. त्यानंतर पालखीची नगरप्रदक्षिणा काढण्यात आली. लहान मुले, तरुण–तरुणी, ज्येष्ठ नागरिक तसेच सर्व धर्मीय भाविक मोठ्या श्रद्धेने या सोहळ्यात सहभागी झाले होते. विशेष म्हणजे कोणतीही अतिआतषबाजी न करता हा सोहळा शांततेत व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला.नगरप्रदक्षिणेनंतर साईबाबांच्या मंदिरात आरती करण्यात आली. त्यानंतर साई भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. दरवर्षीप्रमाणे यंदाही सुमारे ११०० ते १२०० भाविकांनी प्रसादाचा लाभ घेतल्याची माहिती मंडळाच्या अध्यक्षांनी दिली. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंदिराचे अध्यक्ष बबन पाटील, खजिनदार श्रीधर मढवी आणि सचिव भालचंद्र पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या प्रयत्नांमुळे संपूर्ण कार्यक्रम सुरळीत व यशस्वीरीत्या पार पडल्याची भावना भाविकांनी व्यक्त केली. या सोहळ्यामुळे जुईनगर परिसरात भक्ती, एकात्मता आणि सामाजिक ऐक्याचे सुंदर दर्शन घडले.

# चंद्रपूरला प्रगतीपथावर नेण्यासाठी प्रयत्न करणार - जिल्हाधिकारी पंत

## नुतन जिल्हाधिकाऱ्यांचे स्वागत तर माजी जिल्हाधिकाऱ्यांचा निरोप समारंभ

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२०, चंद्रपूर :** चंद्रपूरचे म ाजी जिल्हाधिकारी तथा छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांच्या कार्यकाळात चंद्रपूर जिल्ह्याने विकासात भरारी घेतली. त्यांच्या नेतृत्वात जिल्ह्याने अनेक पुरस्कार प्राप्त केले. गौडा सरांचा खुप अभ्यास असून प्रत्येक बाबींकडे ते अतिशय बारकाईने लक्ष देतात. नंदूरबारमध्ये त्यांच्या मार्गदर्शनात काम करण्याची संधी मिळाली. चंद्रपुरात त्यांनी चांगली टीम निर्माण केली. त्यांनी रचलेल्या पायाचा आणखी विस्तार करुन चंद्रपूरला प्रगतीपथावर नेण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत, अशी ग्वाही जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी दिली. तर चंद्रपूरचे नाते आणि आठवण कायम स्मरणात राहील. येथील कार्यकाळाबद्दल आपल्याला नेहमी कृतज्ञता आणि अभिमान राहील, अशा भावना चंद्रपूरचे माजी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी व्यक्त केल्या.




जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूरच्या वतीने नुकताच नुतन जिल्हाधिकारी वसुमना पंत यांचा स्वागत समारंभ आणि माजी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. नियोजन भवन येथे पार पडलेल्या या कार्यक्रमाला पोलिस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, मनपा आयुक्त अकुनुरी नरेश, सहाय्यक जिल्हाधिकारी लघिमा तिवारी, निवासी उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, उपवनसंरक्षक योगेश वाघाये, सेनिकी स्कूलचे प्राचार्य अश्विनी अनुपदेव, यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व तहसीलदार, सर्व विभागप्रमुख आदी उपस्थित होते.

१४ ऑक्टोबर २०२२ ला चंद्रपूर जिल्ह्यात रुजू झालो, असे सांगून जिल्हाधिकारी गौडा म्हणाले, पहिल्यांदा जिल्हाधिकारी होण्याची संधी चंद्रपूर जिल्ह्यात मिळाली. चंद्रपूर हा जिल्हा राज्याच्या शेवटच्या टोकावर असून विविधतेने नटलेला जिल्हा आहे. साडेतीन वर्षाचा कार्यकाळ आपल्यासाठी अविस्मरणीय राहिला. सर्व टीम मिळून एकजुटीने जिल्ह्याच्या विकासासाठी काम केले, याचा आनंद आहे. लोकसभा, विधानसभा तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अतिशय चांगल्या पध्दतीने पार पाडू शकलो, याचेही समाधान आहे. टीमकडून प्रेमाने काम करुन घेण्याला सर्वोच्च प्राधान्य दिले. केवळ महसूल विभागाचे नाही, तर सर्व विभागाचे सहकार्य आपल्याला मिळाले. चंद्रपूरचा विकास झपाट्याने होत आहे. सामान्य आणि गरजु नागरिकांचे महत्वाचे विषय, त्यांच्या समस्या सोडविल्या तर वेगळेच समाधान मिळते. निराधार तसेच आवाज नसणाऱ्या लोकांची कामे केली तर त्याचा सार्थ अभिमान आहे.

चंद्रपूरच्या जिल्हाधिकारी वसुमना पंत ह्या अतिशय कार्यक्षम अधिकारी आहेत. त्यांच्या कार्यकाळात चंद्रपूरची आणखी चांगली प्रगती होईल, अशी अपेक्षा जिल्हाधिकाकी गौडा यांनी व्यक्त केली.

यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, मनपा आयुक्त अकुनुरी नरेश, सहायक जिल्हाधिकारी लघिमा तिवारी, उपवनसंरक्षक योगेश वाघाये, निवासी उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, तहसीलदार विजय पवार, क्रीडा अधिकारी अविनाश पुंड, जिल्हा माहिती अधिकारी राजेश येसनकर, यांच्यासह नायब तहसीलदार संघटनेचे राजु धांडे, स्वीय सहायक विक्रांत गुप्ता, महसूल कार्यकारी संघटनेचे मम ता दुरटकर, मंडळ अधिकारी संघटनेचे प्रवीण वरभे, ग्राम महसूल अधिकारी संघटनेचेविशाल चांदेकर, शिपाई संवर्गातून अजय मेश्राम, कोतवाल संघटनेचे दयाराम वंजारी, आणि पोलीस पाटील संघटनेचे नितेश वाटोळे आदींनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक उपविभागीय विशालकुमार मेश्राम यांनी तर संचालन अजय मॅकलवार यांनी केले.

### विसापुरात मुलीच्या जन्माचे बैलगाडीतून स्वागत



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२१, विसापूर (चंद्रपूर) :** सामाजिक जीवनात मुलीचा जन्म परक्याचं धन समजण्याची प्रवृत्ती आहे. परिणामी वंशाचा दिवा म्हणून मुलाच्या जन्माचे गोडकौतुक केले जात आहे. यातून लिंग निदान चाचणी करून कच्च्या कळ्यांना गर्भातच मारून टाकले जात आहे. यामुळे समाजात लिंगोत्तर प्रमाण घटले आहे. या प्रथेला फाटा देत बल्लारपूर तालुक्यातील विसापूर गावात मुलीच्या जन्माचे स्वागत बैलगाडीतून मिरवणूक काढून करण्यात आले. अनोख्या पद्धतीने आनंद व्यक्त करण्याच्या प्रसंगाची गावात चर्चा होत आहे. येथील क्षीरसागर व येवले कुटुंबाच्या प्रेरणादायी उपक्रमाचे कौतुक केले जात आहे.

चंदन व प्रतीक्षा येवले यांच्या संसार वेलीवर कन्यारत्नाने जन्म घेतला. याचा आनंद अनोख्या पद्धतीने व्यक्त करण्याची संकल्पना त्यांनी आखली. मुला–मुलीच्या जन्माचे अंतर करायचे नाही. 'मुलगा, मुलगी एक समान',असा संदेश देण्याचा त्यांनी मनोदय व्यक्त केला. याला क्षीरसागर व येवले कुटुंबियांनी होकार दिला. माहेरून घरी आणताना मुलीच्या जन्माचे स्वागत अनोख्या व वेगळ्या पद्धतीने करण्याचे योजले. ही योजना चंदन व प्रतीक्षा येवले यांनी प्रत्यक्षात आणली. प्रतीक्षा ही प्रसुतीसाठी येथील तुकडोजी महाराज चौक परिसरातील वडील सदानंद क्षीरसागर यांच्या घरी गेली होती. तिला कन्यारत्न झाले. प्रथेनुसार सासरचे कुटुंब टोमणे मारतील, अशी मनोभावना प्रतीक्षा होती. मात्र, पती चंदन ची साथ तिला भक्कम मिळाली. माहेरून घरी जाताना, आपला आनंद द्विगुणित केला. बैलगाडीला आकर्षक सजावट केली. कृषी संस्कृतीचे दर्शन घडवून आणले. सजविलेल्या बैलगाडीतून चंदन, त्याची पत्नी प्रतीक्षा व नवजात कन्या रत्नाला बसवले. वाजतगाजत मिरवणूक काढून सासरी आणण्यात आले. हा अनोखा प्रसंग विसापूरकरांनी पहिल्यांदा अनुभवला. मुलीच्या जन्माचे आदरातिथ्य वेगळेपण दर्शविणारे ठरले. मुलगा, मुलगी एक समान याचा संदेश देण्याचा प्रसंग कौतुकास्पद ठरला. याची गावात एकच चर्चा होत आहे.

### पोलीस ठाण्यात पत्रकाराला बजरंग दल कार्यकर्त्यांकडून मारहाण



**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.१९, मिरा भाईंदर :** दि.१९ एप्रिल २०२६ रोजी भाईंदर पश्चिम पोलीस ठाण्याच्या आवारात बातमी संकलनासाठी गेलेल्या एका पत्रकाराला बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी मारहाण केल्याची घटना घडली आहे. यामुळे पत्रकारांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित पत्रकार एका बातमीच्या संदर्भात माहिती घेण्यासाठी भाईंदर पश्चिम पोलीस ठाण्यात गेले होते. पोलीस ठाण्याच्या आवारात ते मोबाईलद्वारे चित्रीकरण करत असताना तेथे उपस्थित असलेल्या बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांना त्याचा राग आला. कार्यकर्त्यांनी पत्रकाराला व्हिडिओ काढण्यास मज्जाव केला.

यावरून दोघांमध्ये शाब्दिक वादावादी झाली. पत्रकाराने मी पत्रकार आहे, बातमीसाठी आलो आहे असे सांगूनही बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी त्यांचे न ऐकता त्यांना मारहाण करण्यास सुरुवात केली. या घटनेमुळे पोलीस ठाण्याच्या आवारात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

पीडित केतन बारिया हे जेष्ठ पत्रकार आहेत. त्यांना पत्रकारितेचा अनुभव आहे.

पोलीस ठाणे हे सार्वजनिक ठिकाण असून बातमी संकलन करणे हा पत्रकारांचा अधिकार आहे. तरीही पोलीस ठाण्याच्या आवारातच पत्रकाराला मारहाण होणे ही गंभीर बाब आहे. या घटनेची चौकशी करून संबंधित कार्यकर्त्यांवर तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी पत्रकार संघटनांकडून केली जात आहे.

या प्रकरणी दिनांक २१.०४.२०२६ रोजी सकाळी ११ वा. गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस प्रशासनाने या घटनेची दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करेल, असे आश्वासनं पोलिसानी पत्रकार संघटनेला दिले आहे. पोलीस योग्य ती कारवाई करतील अपेक्षा व्यक्त जात आहे.

# जागतिक वसुंधरा दिनानिमित्त सिंहगड स्कूलमध्ये वृक्षारोपण व पर्यावरण जनजागृती अभियान

## एक विद्यार्थी – एक झाड उपक्रमांतर्गत देशी औषधी वृक्षांची लागवड; विद्यार्थ्यांना रोपांचे वाटप

**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.२१, सोलापूर :** जागतिक वसुंधरा दिनाचे औचित्य साधून सोलापूर महानगरपालिका, सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, सोलापूर आणि इको नेचर क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने शाळेच्या परिसरात वृक्षारोपण व पर्यावरण जनजागृती कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या उपक्रमांतर्गत देशी औषधी वृक्षांची लागवड करण्यात आली. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांशी पर्यावरण संवर्धनाबाबत संवाद साधण्यात आला. वाढत्या प्रदूषणाचा पृथ्वीवर होणारा परिणाम, झाडांचे महत्त्व आणि पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येकाने निभावायची जबाबदारी याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.



विशेष आकर्षण ठरलेल्या एक विद्यार्थी – एक झाड या संकल्पनेअंतर्गत प्रत्येक विद्यार्थ्याला एक रोप भेट देण्यात आले. या माध्यम ातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करून वृक्षलागवडीची सवय रुजविण्याचा संकल्प करण्यात आला. यावेळी सोलापूरच्या नूतन उपमहापौर ज्ञानेश्वरी महेश देवकर यांनी प्रत्येक नागरिकाने आपल्या परिसरात किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याचे आवाहन केले. पर्यावरणाचे संरक्षण हे केवळ एक दिवसापुरते न राहता जीवनशैलीचा भाग बनले पाहिजे, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमास विशेष कार्यकारी अधिकारी महेश देवकर, वसुंधरा अभियानाचे पर्यावरण दूत मनोज देवकर, कॅम्पस संचालक संजय नवले, प्राचार्या शाहीन शेख, उपप्राचार्या निखत शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले, इको नेचर क्लबच्या संचालिका व कृतिशील शिक्षिका मंजुषा सावंत तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धनाच्या घोषणा देत उत्साहपूर्ण सहभाग नोंदवला. तसेच वर्षभर पर्यावरण व पृथ्वी संवर्धनासंदर्भात विविध उपक्रम राबविण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.